मुद्दा क्र. ५

(6)

20090803184153001

महाराष्ट्र शासन

क्र.जिपर २००९/प्र.क्र.१८०/पं.रा.८,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३ ऑगस्ट २००९.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, (सर्व)

विषय :-रस्त्यांच्या कामांच्या दोष निवारण कालावधी (Defect Liability Period) मधील दुरुस्ती व त्याबाबतचे सविस्तर माहिती फलक कामाच्या जागेवर बसविण्याबाबत.

संदर्भ :- शासन पत्र समक्रमांक दि.४.७.२००९.

उपरोक्त विषयाप्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण भागातील रस्त्यांवर कामाचे ठिकाणी माहिती फलक बसविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत या माहिती फलकामध्ये कंत्राटदाराचे नांव ,कार्यारंभ आदेश,कामाचा खर्च,काम पूर्ण करावयाचा दिनांक,दोष निवारण कालावधी या सर्वांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.

ग्रामीण भागातील रस्त्यांवर असे फलक अनेक ठिकाणी नसल्याचे आढळून येत असल्याचे ज्येष्ठ समाजसेवक श्री.अण्णा हजारे यांनी निदर्शनास आणून दिले आहे. तेव्हा संदर्भाधीन दिनांक ४.७.२००९ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनेनुसार जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील रस्त्यांवर कामाचे ठिकाणी वरीलप्रमाणे माहितीचे फलक बसविणेबाबत त्वरित कार्यवाही होईल याबाबत दक्षता घ्यावी व आपणाकडील माहिती उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय यांचेमार्फत दरमहा दिनांक ५ तारखेपर्यंत या विभागाकडे उपलब्ध होईल अशारितीने पाठवावी.

सदर विषय मासिक बैठकीमध्ये समाविष्ट करण्याबाबत आपणांस संदर्भाधीन पत्रान्वये सूचना दिलेल्या आहेत. तसेच याबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या

राज्यस्तरीय आढावा बैठकीमध्ये याबाबत आढावा घेण्यात येणार आहे याची सर्व मुख्य व
अधिकारी यांनी नोंद घ्यावी.तसेच संदर्भाधीन शासन पत्र दिनांक ४.७.२००९ मधील तरतु
फलक बसवायचे आहेत. कार्यारंभ आदेशामध्ये सुध्दा अशातऱ्हेचे माहिती फलक लावण
विशेष उल्लेख करावा. यासंदर्भात अशातऱ्हेची कार्यवाही न करणाऱ्या अधिकारी/अधिकाऱ्य
शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील क
खालील तरतुदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल , याची कृपया नोंद घ्यावी.

(दि.ग.मोरे)
उप सचिव , महाराष्ट्र शासन.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-
१) सर्व विभागीय आयुक्त
२) सर्व उपआयुक्त (विकास)विभागीय आयुक्त कार्यालय
३) सर्व जिल्हा परिषदांचे कार्यकारी अभियंता (बांधकाम)